# आदिवासी साहित्य, समाज, संस्कृती आणि विकास



संपादक

डॉ. शशिकांत साळवे

Aadivasi Sahitya, Samaj, Sanskruti Ani Vikas
आदिवासी साहित्य, समाज, संस्कृती आणि विकास

संपादकाधीन

प्रकाशक : सौ तारादेवी भास्कर शेळके
१२१, श्रीदुर्गा, बारव, ता. जुन्नर,
जि.पुणे, ४१० ५०२

मुखपृष्ठ : निखिल लंभाते

प्रकाशन क्रमांक : ३८

प्रथमावृत्ती : २८ डिसेंबर २०१८

अक्षरजुळणी : यशोदीप पब्लिकेशन्स्
२१७ ब, नारायण पेठ, पुणे-३०.

मुद्रक : समर्थ प्रोसेस, पुणे

ISBN : 978-93-84309-36-7

मूल्य : रु. ४५०/-

# आदिवासी साहित्य, समाज, संस्कृती आणि विकास

संपादक
डॉ. शशिकांत साळवे

शब्दश्री प्रकाशन, जुन्नर

# अनुक्रमणिका


* आदिवासी हेच मूळ निवासी – प्रा. अशोक खंडू मोरमारे ९
* आदिवासी साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती – प्रा.डॉ. माहेश्वरी गावित १७
* आदिवासी साहित्य संकल्पना, स्वरूप व व्याप्ती – भागवत बाबासाहेब देशमुख २६
* आदिवासी साहित्य : प्रेरणा, स्वरूप, व्याप्ती – डॉ. गोविंद गायकी ३४
* आदिवासी साहित्य स्वरुप व प्रेरणा – नेटके राजेश अविनाश ४५
* मराठीतील साहित्य प्रवाह: आदिवासी साहित्य – डॉ. रवींद्र रामचंद्र शिंदे ५१
* आदिवासी समाजाची स्थिती आणि गती – प्रा.डॉ. कृष्णा भवारी ५७
* आदिवासी समाजाची स्थितीगती – प्रा. डॉ. समिंदर मधुकर घोक्षे ७०
* आदिवासी समाजाची स्थितीगती – प्रा. नामदेव बांगर ७८
* आदिवासी साहित्य आणि समाजजीवन – सौ. मोहिते सुलभा शिवाजीराव ८३
* आदिवासी साहित्य आणि समाजजीवन – निकिता अनिल शेंडगे ९२
* आदिवासींचे समाजजीवन – प्रा. विक्रम ओतारी ९८
* आदिवासी साहित्य समाज आणि कलाविष्कार – प्रा. लक्ष्मण धावारे १०२
* आदिवासी साहित्य आणि कलाविष्कार – प्रा. चिंतामण धिंदळे १०७
* आदिवासी समाज व त्यांचा धर्म – प्रा. राजू शंकर शनवार ११९
* आदिवासींचे जीवनविश्व – डॉ.विठ्ठल केदारी १२५





* आदिवासी साहित्य आणि स्त्रीजीवन – प्रा. गोविंद मुंढे १३३
* आदिवासी आणि मानव स्वभाव – शकील जाफरी १३८
* आदिवासी साहित्य : समाज, संस्कृती आणि विकास – प्रा. सुरकुले अनिता सोमनाथ १४६
* आदिवासी लोकसंस्कृती स्वरूप विकास आणि समस्या – डॉ. शशिकांत साळवे १५४
* आदिवासी समाज : रूढी, परंपरा आणि प्रथा – प्रा. महादेव काळूराम रोकडे १५८
* आदिवासी साहित्य, संस्कृती व लोककला – प्रा.डॉ. अनिल गर्जे १७०
* आदिवासी समाज रूढी परंपरा आणि प्रथा – मनोहर दुलाजी मोहरे १८३
* आदिवासी ठाकर लोकगीतातून व्यक्त होणारे सामाजिक – सांस्कृतिक जीवन – प्रा. सुनिलदत्त गोडसे १९३
* आदिवासी समाज आणि बोली – मंगेश पंढरीनाथ जोर्वेकर १९८
* आदिवासी ठाकर बोली – प्रा.डॉ. सुनिल घनकुटे २०४
* आदिवासी नृत्यकला – प्रा.रूपाली कांबळे २१५
* डांगाणातील आदिवासी महादेव कोळी यांचे सण उत्सव आणि लोकविधी – प्रा. श्री. यशवंत भांडकोळी २२२
* आदिवासींचा वाघया देव – डॉ.अंजली मस्करेन्हस २४२
* आदिवासींचे वीर – प्रा.डॉ.शिखरे गोकुळ २४९
* "आदिवासी मावची समाजातील देवदेवता : एक अभ्यास" – गावित लता कथ्थु २५६
* आदिवासींची दैवते – प्रा. संतोष मारुती शिंदे २७०
* मराठी साहित्यात आदिवासी कथेचे योगदान – प्रा.आहेर एकनाथ पंडित २७४
* नव्वदोत्तर मराठी आदिवासी कथा – डॉ. संजय लोहकरे २८३

नातेसंबंधावर भाष्य करताना दिसते. त्यांच्या कवितेमधील शब्दांचे वेगळेपण सांगताना डॉ.संजय लोहकरे म्हणतात की, तुकारामाने नाना प्रकारचे अनेक अर्थाचे प्रचीतींचे, संवेदनांचे शब्द आपल्या कवितेत आणले. उदाहरणार्थ खंगर, जेठवाडी, खोबण, हांडे, भांड्यांची जत्रा भरणे, तराट, सिपला, धांदुक, ओपली, सनइधार, लांड्या-पंड्या, फडकी, वाघाचे लवण, बांद्र नळी, तिकिंडा, यंगून, मळई, गरवणी, नरपुंगव, आबुट, चिंदाड, भूस्काट, बुरंगाट, पोहुळदे इ.८ अशाप्रकारे तुकाराम धांडे यांची कविता आदिवासी समाजाच्या व्यथा वेदना मांडताना दिसते. त्यांच्या कवितेने आदिवासी समाजाची भाषा जिवंत केली आहे. कधी कधी त्यांची कविता विद्रोहाचे रूप धारण करताना दिसते.

संदर्भ ग्रंथ


१) डॉ. रोंगटे तुकाराम, आदिवासी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा, दिलीपराज प्रकाशन, पुणे. प्र.आ.२६ जानेवारी २०१४. पृ.क्र. ३०,३१.
२) डॉ. चांदवडकर तुषार, प्रा.गोखले चारुता, नव्वदोत्तरी मराठी साहित्य आणि समाज कुसुमाग्रज प्रकाशन, नाशिक. प्र.आ. १६ सप्टेंबर २०१६, पृ.क्र. ६२.
३) डॉ.लोहकरे संजय, वळीव एक आकलन, अक्षता प्रकाशन,पुणे. प्र.आ.११ सप्टेंबर २०१०. पृ.क्र. ०५.
४) तत्रैव, पृ.क्र. ०५
५) तत्रैव, पृ.क्र. ०५
६) तत्रैव, पृ.क्र. ०६
७) तत्रैव, पृ.क्र. १०
८) तत्रैव, पृ.क्र.१४




# आदिवासी साहित्य समाज, संस्कृती आणि विकास

प्रा.डॉ.वागुल एम.एम.

आदिवासी समाज हा जंगलमय प्रदेशात व डोंगराळ विभागात वास्तव्य करून आपल्या दैनंदिन व्यवहारातील गरजा या जंगलातून मिळवित असतो. म्हणून वर्षानुवर्षे आणि पिढ्यानुपिढ्यांच्या वास्तव्यांमुळे त्या परिसरातील निसर्ग आणि आदिवासी हे जणू काही एकरूप झाले आहेत. आदिवासी लोक ज्या ज्या भागात राहतात त्या भागाचे भौगोलिकदृष्ट्या तीन विभाग पडतात.

१) सह्याद्री विभाग : सह्याद्री पर्वतरांगांच्या विभागात महादेव कोळी, वारली, कोकणा, भिल्ल, ठाकर, कातकरी या जमातींचे वास्तव्य आहे.

२) सातपुडा विभाग: सातपुडा पर्वतरांगांच्या या विभागात भिल्ल, कोकणा, गावित, टुबळा, धनका या जमातींची वस्ती आहे.

३) गोंडवन विभाग: विदर्भातील डोंगराळ आणि जंगलमय प्रदेशात गोंड, माडिआ, मुरिआ, परधान, कोरकू, कोलाम, आंध, हलवा या जमाती वस्ती करून राहतात.

महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवासी जमाती आहेत. या आदिवासी

जमाती बहुधा जंगलव्याप्त क्षेत्रात वास्तव्य करून राहतात. जंगल हे आदिवासींचे निवास आहे. आपले अस्तित्व टिकविण्याकरीता व जीवन आणि त्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आदिवासी हा जंगलातील भाज्या व फळे आपल्या दैनंदिन जीवनात अन्न म्हणून वापरतात. वेलची भाजी, तेरा, अळीम, कडूकंद, हालूनंद, गोमठा,श्रीसफुल मोखा, झेलाची भाजी, चूचूची भाजी, भूयफोड, थोदडा, कर्टूलची भाजी, टोळंबा, माटाची भाजी इत्यादी भाज्या आहारात वापरतात. तर फळे करवंदे, गोमटा, आंबा, आवळा, टेंबरून इत्यादी जंगली फळे आदिवासी आपल्या आहारात आणि अन्नात उपयोगात आणतात. निसर्गातील खाद्यामुळे आदिवासींची मुले पोसली गेली आणि मोठी झाली. परंतु आता आदिवासींचा नागरी संस्कृतीचा संबंध येऊ लागल्यामुळे आहारामध्ये वर्तमानकाळात बदल होत आहे.

आदिवासी साहित्याचा अभ्यास करीत असताना प्रथम आदिवासी मौखिखक बोली यांचा विचार करावा लागतो. कारण अगोदर भाषा जन्माला येते आणि नंतर साहित्य येते. म्हणून त्यांचे दैनंदिन व्यवहार हा त्या त्या प्रादेशिक आदिवासी बोलीतून होत असतो. जन्म-मृत्यू विधी, लग्नविधी, देवदेवतांची पूजा, सण उत्सवातील आनंद, आचार-विचार, निती-नियम हा सर्व व्यवहार बोलीभाषेतून होत असतो. या आदिवासी लोकजीवनाचे दर्शन आदिवासी लेखकांनी आपल्या साहित्यकृतीतून चित्रण केले आहे. साहित्य हे समाजाचा आरसा आहे. प्रत्येक जमातीचा सामाजिक जीवन हे त्यांच्या भोवतालच्या भौगोलिक आणि परंपरागत चालत आलेल्या आणि झालेल्या जीवनदृष्टीने बनलेले आहे. तसे असले तरी सर्वसामान्य या जमातीचे लोकजीवन, मुल्ये आणि वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा पहावयास मिळतो. या जमातींच्या वस्तीमध्ये इतर समाजाचे वास्तव्य नसल्यामुळे एकमेकांबद्दल आत्मीयता, आपुलकी, दैवतवादी, जिव्हाळा, प्रेम ही लक्षणे दिसून येतात.

शहरी लोकजीवन, ग्रामीण लोकजीवन आणि आदिवासी लोकजीवन या तीन प्रकारात विभागता येईल. आदिवासी लोकांचे व्यवसाय, पोशाख, आहार, सण, उत्सव, घरे, भाषा, लोककला सर्व गोष्टी त्या त्या परिसरातील नैसर्गिक परिस्थितीनुसार सामाजिकतेमध्ये परिवर्तन होत असते. ग्रामीण



भागातील बहुसंख्य लोक शेती, मजुरी, व्यवसाय करतात. आदिवासी समाज हा अक्षयतृतीया, दिवाळी, पोळा, ईद, मोहरम इत्यादी सण, उत्सव ग्रामीण भागात मोठ्या उत्साहाने साजरे करतात. हिंदू, मुसलमान आणि आदिवासी यांच्यामध्ये एकोप्याचे संबंध आहेत. आदिवासी जमातीच्या वस्त्या बहुतेक एकचा गावात वस्ती करून राहतात. त्यामुळे अडीअडचणीला एकमेकांच्या मदतीला धावून जातात. एखादी व्यक्ती आजारी असेल, त्या व्यक्तीला पैशाची अडचण असेल तर त्यांना आर्थिक मदत करतात. आजारी माणसास भेटण्यासाठी रूग्णालयात धाऊन जातात. ती व्यक्ती कोणत्या जातीची आहे असा भेदभाव केला जात नाही. आदिवासी जमातीमध्ये पूर्वीपासून जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झालेले आहेत.

साहित्य हे समाजातूनच निर्माण होत असते कारण लेखक कवी हा समाजाचा घटक असतो. लेखक ज्या प्रांतात जन्माला येतो. त्या प्रांतातील वातावरणाचा प्रभाव त्या लेखकावर होत असतो. त्यांनी अनुभवलेले, पाहिलेले, भोगलेले प्रसंग आपल्या साहित्यातून वास्तव चित्रण करीत असतात. म्हणून साहित्य आणि समाज यांचा संबंध म्हणजे चिखल व पाण्यासारखा आहे. साहित्य आणि समाज यांचे नाते अतूट असे असते.

मराठी साहित्यामध्ये आदिवासी साहित्यप्रवाह आता कायम स्थान निश्चित करू लागला आहे. आदिवासी साहित्य हे आदिवासी समाजाच्या व्यापक परिवर्तनामध्ये चळवळीत निर्माण झाले आहे. विषम समाज व्यवस्थेने मूळ रहिवासी असणाऱ्या आदिवासी समाजाला माणूसपणापासून आणि विकासापासून वंचित ठेवले. त्यांची विविध मार्गाने पिळवणूक, शोषण केले. याचे सर्वांगीण दर्शन साहित्यातून पहावयास मिळते. आदिवासी साहित्याच्या विकासातही काव्यनिर्मितीला महत्त्वाचे स्थान आहे. आदिवासी कविता म्हणजे आदिम जीवनानुभूतीचा अविष्कार होय. आदिम संवेदनेतून ती निर्माण झालेली दिसते. आदिवासी कविता ही समुहाचा अविष्कार होय. समुहाने राहणारा आणि सुख दुःख समुहाने भोगणारे समाजदर्शन आदिवासी साहित्यातून पहावयास मिळते.

संस्कृती ही व्यापक व्यामिश्र लवचिक व प्रवाही आहे. संस्कृती ही

संकल्पना वेगवेगळ्या अर्थाने वापरली जाते. माणूस समाजाचा एक घटक म्हणून ज्या ज्या गोष्टी आत्मसात करतो, त्याला उद्देशूनच संस्कृती हा शब्द वापरला जातो. संस्कृती निर्मितीसाठी आणि विकासासाठी आवश्यक असणारी क्षमता मानवांमध्ये आहे. म्हणूनच मानव संस्कृती निर्माण करू शकला. त्यामुळे तिची वाढ होऊ शकली. बुद्धीमत्ता, कल्पनाशक्ती, आकलनशक्ती, बोलण्याची क्षमता, विशिष्ट शरीररचना इत्यादी लक्षणांमुळे मानव संस्कृतीची निर्मिती करून ती पिढ्यान्‌पिढ्या चालू आहेत. अशा विविध विचारवंतांनी संस्कृतीविषयी विचार व्यक्त केले आहेत.

१. टायलर यांच्या मते, 'समाजाचा घटक म्हणून व्यक्ती जे ज्ञान, श्रद्धा, कला, नीतितत्त्वे आणि रूढी व तत्सम इतर क्षमता आणि सवयी प्राप्त करून घेते. त्या सर्वांच्या संमिश्र एकत्रीकरणाला उद्देशून संस्कृती असे म्हणतात.'

२. सी.सी.नॉर्थ यांच्या मते, 'मानवाने आपल्या गरजा भागविण्यासाठी निर्माण केलेल्या सर्व साधनांचा समावेश संस्कृतीमध्ये होतो.'

३. डॉ.इरवती कर्वे यांच्या मते, 'मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक व वस्तुरूप निर्मिती पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती. ही वैयक्तिक व सामाजिक जीवन पद्धती निर्माण करते. मनुष्य ज्या संस्कृतीत जन्म घेतो ती संस्कृती शिकावी लागते. तसेच संस्कृतीचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातो. यामुळे संस्कृतीचे सातत्य टिकून राहते.'

आदिवासी संस्कृती हिच आदिवासींच्या आदर्शन जीवनप्रणाली आहेत. आदिवासी समाज हे इतर समाजापेक्षा भिन्न आहेत. आदिवासी संस्कृती ही जगातल्या बहुतेक धर्मापेक्षा वेगळी दिसते. आदिवासी संस्कृतीवर कित्येक धर्मांनी आपला प्रभाव टाकला. पण आदिवासींनी तिचा स्वीकार केला नाही. तर धर्मांतरित आदिवासीसुद्धा आपल्या समाजामध्ये नातेसंबंधित म्हणून सामुहिक कार्यक्रमात सहभागी होतात. यातच आदिवासी संस्कृतीचे मोठेपण दिसते. आदिवासी संस्कृतीनेच हिंदू धर्माच्या सांस्कृतिक वारसाला जन्माला



घातले. कारण अगोदर माणूस जन्माला आला व त्याने स्वत:चा समुहजीवन प्रणालीसाठी धर्म जन्माला घातला. तेव्हा आदिवासी या देशाचे मूळ रहिवासी आहेत. म्हणून आदिवासी संस्कृतीचा उद्‌गाता कोण आहे हे सांगणे कठीण आहे. अशा प्रकारे आदिवासी परंपरा आणि संस्कृती निसर्गाचा आदर जोपासना करायला शिकवते. म्हणून आदिवासी जीवन हे निसर्गाधीन असते. आदिवासी जमातींची धर्मकल्पना आणि संस्कृती ही देखील निसर्ग या आधारावरच विकसित झालेल्या आहेत. या आदिवासी जमातीची स्वत:ची अशी खास संस्कृती निर्माण झाली आहे.

साहित्य हे समाजातूनच निर्माण होत असते कारण लेखक व कवी हा समाजाचा घटक असतो. लेखक ज्या प्रांतात जन्माला येतो त्या प्रांतातील वातारवणाचा प्रभाव त्या लेखकावर होत असतो. त्यांनी अनुभवलेले, पाहिलेले. भोगलेले प्रसंग आपल्या साहित्यातून वास्तव चित्रण करीत असतात. म्हणून साहित्य आणि यांचा संबंध चिखल व पाण्यासारखा आहे. साहित्य आणि समाज यांचे नाते अतूट असे नाते असते. मराठी साहित्यामध्ये आदिवासी साहित्यप्रवाह आता कायम स्थान निश्चित करू लागला आहे. विषम समाज व्यवस्थेने मूळ रहिवासी असणाऱ्या आदिवासी समाजाला माणूसपणापासून विकासापासून वंचित ठेवले. त्यांची विविध मार्गाने पिळवणूक, शोषण केले जाते. यांचे सर्वांगीण दर्शन घडते. आदिवासी साहित्याच्या विकासातही काव्यनिर्मितीला महत्त्वाचे स्थान आहे. आदिवासी कविता म्हणजे आदिम जीवनानुभूतींचा अविष्कार होय. आदिम संवेदनेतून ती निर्माण झालेली दिसते. आदिवासी कविता ही समुहाचा अविष्कार होय. समुहाने राहणारा आणि सुख दु:ख समुहाने भोगणारे समाजदर्शन आदिवासी साहित्यातून पहावयास मिळते.

डॉ.गोविंद गारे यांनी 'अनुभूती' या कवितासंग्रहामध्ये सत्तावण्ण झुंझारांनो, मूळ रहिवासी, आदिवासी त्यांना भेटलो. तेव्हा ती माणसेच होती. झाडांच्या मित्रांनो या कवितेतून आदिवासी समाज जीवनाचे दर्शन घडवित असतात. 'मूळ रहिवासी...'

'जगतात ते

मरण येत नाही म्हणून
मरतात ते... जगता येत नाही म्हणून
कशाकरीता जगणे, कशाकरीता मरणे
यातला फरक कोणी त्यांना सांगितला नाही.'

आदिवासी समाज हा मरण येत नाही म्हणून जगत असतो. अशी अवस्था आज आदिवासी समाजाची झाली. आदिवासी समाज हा राक्षस, असूर, पापी, अक्राळविक्राळ प्राणी, लंगोटे, नरभक्षक अशा विविध शब्दांनी आदिवासींची कुचंबना होत आहे. आदिवासी समाजाची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होत आहे.

'एक वारली पाडा, पंधरावीस घरांचा,
मोडक्या झोपड्यांचा, आणि तुटलेल्या छप्परांचा
माणसं होती तेथे सुकलेली. डोळं कवटीत गुंतलेली
अकाली म्हातारपणानं वाकलेली'

वारली जमातीचे चित्र कवी रेखाटताना वारली समाज हा पोटासाठी दिवसभर रान तुडवित असतो. आदिवासी समाज हा कोणत्याही जातीचा असो मोडक्या झोपड्या, तुटक्या छपरांची त्याची झोपडी असते. माणसं ही सुकलेली असतात. जणू काही कवटीत फक्त डोळेच दिसतात. अशी अवस्था आदिवासी जमातींची आहे.

वाहरू सोनवणे यांचे 'गोधड'पालमांडी वस्ती' या कवितेतून सामाजिक दर्शन घडते.

एक वस्ती, तिथं पालं मांडतात,
पोटासाठी पोट आलं, तरीही त्यांना
पाल मांडावंच लागतं, पालमांडी वस्ती ती'

आदिवासी समाज हा मोलमजुरी करण्यासाठी पोटासाठी दुसरीकडे स्थलांतरीत होत असतो. त्यामुळे जिथे जातो तिथे आपला पाल बांधीत असतो.

आदिवासी बोली या आदिवासी साहित्यिकांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग आहे. भुंजक मेश्राम यांनी गोंडी भाषेतून, वाहरू सोनवणे



यांनी भिल्ल भाषेतून, गोविंद गारे यांनी महादेव कोळी या बोली भाषेतून साहित्य निर्मिती केली.

संदर्भग्रंथ

१. निवडक विनायक तुमराम, संपा. डॉ.सुधाकर पंडितराव बोथीकर.
२. आदिवासी आयकॉन्स, तुकाराम रोंगटे.
३. गोधड, वाहरू सोनवणे.
४. फडकी, धनंजय पवार.
५. आदिवासी साहित्य नियतकालिक, डॉ.तुकाराम रोंगटे.
६. आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या, डॉ.प्रमोद मुनघाटे.
७. आदिवासी कविता आकलन आणि मुल्यमापन, डॉ.सुभाष पुलावळे.